# बांदोडकर महाविद्यालय आणि हरियाली यांचे शून्य कचऱ्यासाठी अभियान

हरियाली पर्यावरण क्षेत्रात गेली २० वर्षे काम करत असलेली संस्था असून 'घन कचरा व्यवस्थापन' ही काळाची गरज आणि नागरिकांची जबाबदारी या संवेदनशील विषयावर दि.१९/३/२०१७ रोजी, अर्धा दिवसीय चर्चासत्र ठाणे येथील बांदोडकर सायन्स कॉलेजच्या सहयोगाने आयोजिले होते. सदर चर्चासत्रात विविध संस्थामधील तज्ञ व्यक्तींनी भाग घेतला.

पहिल्या सत्रामध्ये म्युनिसिपल घनकचरा निर्माण होणाऱ्या जागा त्याचे वर्गीकरण आणि पर्यावरणावर होणारा परिणाम याबद्दलची माहिती डॉ. निलिमा कुलकर्णी यांनी विशद केली. घनकचरा यातील विविध घटक आणि त्याचा होणारा घातक परिणाम याबद्दल माहिती देताना पार्टीक्युलेट मॅटर, जे मानवाच्या फुफ्फुसावर परिणाम करतात, आणि घनकचऱ्याचे इतर घटक, याचे विवरण केले.

मुंबई म.न.पा. च्या श्रीमती कोलते यांनी घनकचरा एकत्रित करणे, वाहून नेणे ह्याबद्दल माहिती देताना मुंबई महानगरपालिकेचे उदाहरण दिले. मुं.म.न.पा.च्या प्रदेशात साधारणत: प्रतिदिनी ९०० मे. टन कचरा २४ विभागातून उभराव भूमीवर पाठविण्याची प्रक्रिया ही किती गुंतागंतीची आहे हे सांगितले. म्हणूनच लोकांच्या सहभागातून आणि विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून व्यवस्था उभारणे किती गरजेचे आहे ह्याबद्दलची माहिती दिली. याच सत्रामध्ये हरियालीचे अध्यक्ष श्रीयुत सतीश आठल्ये यांनी शास्त्रीयदृष्टया प्रक्रिया करावयाची झाल्यास किती प्रकारच्या पध्दती वापरता येतील याची माहिती दिली. त्यांनी असे निदर्शनास आणले कि आधीच्या वक्त्यांनी सांगितल्याप्रमाणे कचरा जेथे उत्पन्न होतो तेथेच त्यावर प्रक्रिया आणि निचरा करणे अत्यंत गरजेचे व कमी खर्चाचे आहे. त्यासाठी हरियाली संस्थेने विकसीत केलेल्या पध्दतीने खतनिर्मिती करुन एकात्मीक पध्दतीने खताचा वापर करणे कसे शक्य आहे, आणि

समाजासाठी हितावह आहे यावर भर दिला. त्यांनी असे पण सांगितले कि शून्य कचरा व्यवस्थापन आणि विकेंद्रीत व्यवस्थापन ह्या गोष्टीचे महत्व स्थानिक स्वराज्य संस्था आणि लोकांनी ओळखण्याची गरज निर्माण झाली आहे. अशा व्यवस्थेत एकत्रिक कचराभूमीला कुठेही स्थान नसावे आणि जास्तीत जास्त १० टक्के कचरा अशा भूमीवर पाठविणे शक्य आहे असे प्रतिपादन केले. हरियाली संस्थेने मुलुंड, ठाणे परीसरात ४० निवासी संकुले आणि १५ उद्याने, येथील विघटनशील ओला आणि हिरवा कचरा मागील ३ वर्षाच्या प्रयत्नातून वैज्ञानिक दृष्टीकोनातून चांगल्या प्रकारे हाताळण्याचे शिक्षण लोकांना दिले आणि यशस्वीपण केले. पुढची पायरी म्हणजे, हॉटेल्स आणि मार्केटमधील टी विभागातील ओला आणि हिरवा कचऱ्यावर प्रक्रिया करुन खतनिर्मिती करणे साध्य केले. त्यासाठी आर्ट ऑफ लिव्हिंगच्या व्यक्ती विकास केंद्राच्या यांच्या आर्थिक सहाय्यातून प्रकल्प यशस्वी केला आहे. टी विभागात साधारण ३ ते ४ मे.टन प्रतिदिनी कचऱ्यावर प्रक्रिया करुन ९०० किलो खत प्रतिदिनी निर्माण होत आहे. कचऱ्याचे प्रमाण आजमितीतील ५ ते १० टक्के असले तरी एक चांगली सुरुवात करुन हरियालीने योग्य तो पायंडा पाडला आहे. श्रीमती डॉ. बोरकर यांनी या सत्राचे अध्यक्षपद भूषविले आणि सर्व सहभागी वक्त्यांचे कौतुक केले.

दुसऱ्या सत्रामध्ये निवासी संकुलातील प्रक्रिया केंद्रांची माहिती आणि त्यातील असंख्य अडचणी व त्यातून मिळवलेले यश तीन वक्त्यांनी अत्यंत प्रभावी पध्दतीने मांडले. सौ. विभावरी चंदे यांनी मिथिला, चित्रकुट, अरिहंत दर्शन, अरिहंत कृपा, दुर्गानिवास १ आणि २ या संकुलातील ओला आणि हिरवा कचरा वर्गीकरण करुन योग्य त्या कचऱ्याकुंड्यात प्रक्रिया करुन खतनिर्मिती केल्याची यशस्वी गाथा सांगितली. मुलुंडमधील रुनवाल हाईट या १८० फ्लॅटमधील रहिवाशांच्या सहभागातून मागील ३ वर्षे कशा प्रकारे यश मिळविली याचे वर्णन श्रीमती सरिता पुंजा यांनी प्रभावीपणे मांडले. ठाणे येथील

फ्लॉवर व्हॅली या संकुलात ३८० सदनिकातून अशा तऱ्हेची प्रक्रिया केंद्रे चालवून, त्यातील मिळालेल्या खतातून साधारण ५००० रोपटी तयार केली गेली, याची संपूर्ण माहिती श्रीयुत नायक यांनी दिली.

याच सत्रातील अनिवासी जागांमधून म्हणजेच निर्माल्य तयार होणाऱ्या जागा वगैरेतून ठाणे कोपरी येथे म.न.पा.च्या मदतीने ४ ते ५ मे.टन प्रतिदिनीचा प्रकल्प कशारितीने व यशस्वी झाला याची माहिती समर्थ भारत संस्थेचे श्री बटु सावंत यांनी विशद केली. ठाणे म.न.पा.च्या मदतीने पुढील दोन वर्षात समर्थ भारत शून्य कचरा व्यवस्थापनाची स्वप्न साकार करण्यासाठी संकल्पीत योजना कशा प्रकारे करणार आहे. याचा माहिती श्री बटु सावंत यांनी दिली. मुलुंड येथील मालवीय रोड येथील मुं.म.न.पा.च्या भूखंडावर हरियालीने १ डिसेंबर २०१६ राजी जो प्रकल्प सुरु केला त्यातून ३ महिन्यात खतनिर्मितीची यशोगाथा श्री.जोसेफ फर्नांडीस यांनी सांगितली. बांदोडकर कॉलेजच्या प्रो.शीतल पाचपांडे यांनी कॉलेजमधील संकुलात बायोकंपोस्टची निर्मिती मागील ३ वर्षे कशाप्रकारे चालू आहे. याची माहिती उपस्थितांना दिली त्यांनी असे पण सांगितले कि घनकचरा व्यवस्थापनात आणखी व कमी खर्चाच्या चांगल्या प्रक्रिया शोधून त्याची अंमलबजावणी त्यांच्या संकुलात करण्यासाठी काही विद्यार्थी प्रयत्नशील आहेत. या चर्चासत्राचे अध्यक्षपद श्री.श्रोत्रीय यांनी भूषविले आणि उपस्थितांना संबोधित करताना असे सांगितले की, घनकचरा व्यवस्थापनातील लोकांचा सहभाग म्हणजे मोठी देशसेवाच आहे.

तिसऱ्या सत्रामध्ये तज्ञ श्रीमती डॉ.माधुरी पेजावर, रश्मी जोशी आणि श्री.तानाजी घाग यांनी भाग घेतला. या सत्राचे स्वरुप पॅनेल डिस्कशन आणि उपस्थितांकडून आलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे असे होते. रश्मी जोशी यांनी ओला आणि सुका कचरा किती चांगल्या प्रकारे हाताळता येईल, याची माहिती उपस्थितांना दिली. श्री.तानाजी घाग यांनी पथनाटयाद्वारे लोकजागृती कशी करावी हे सांगितले. कचरा वेचक समूह, कि ज्यात, जास्तीत जास्त स्त्रीया आज कार्यरत आहेत, त्यांना एकत्र करुन त्यांच्या

समस्यांवर मात करण्यासाठी काय उपाययोजना होू शकते याची माहिती घाग यांनी दिली या चर्चासत्राच्या अध्यक्ष डॉ.माधुरी पेजावर यांनी गांडूळ खतनिमिर्तीतील प्रक्रिया होत असताना बायोलॉजीकल घटनांचे वर्णन अत्यंत प्रभावीपणे मांडले आणि सर्व उपस्थितांना त्याबद्दल शास्त्रशुध्द आणि उपयुक्त माहिती मिळाल्याचे समाधान झाले. जिवाणूंची कशारितीने मदत होऊ शकते, त्याची माहिती देखिल त्यांनी अत्यंत प्रभावीपणे सांगितली.

हरियाली आणि बांदोडकर कॉलेज यांचे संयुक्त विद्यमाने घडवून आणलेल्या चर्चासत्राचे फलित म्हणजे सर्व उपस्थितांना घनकचऱ्याचे प्रकार, त्याचे एकत्रीकरण आणि विघटनीकरण, वाहून नेण्याच्या प्रक्रिया, एकत्रित व विकेंद्रीत प्रक्रिया, त्याचे फायदे, तोटे आणि एम.एस.डब्ल्यू. २०१६ आणि भारत सरकारचा सर्विस लेव्हल बेंचमार्कच्या माध्यमातून, सर्वकश आणि अभ्यासपूर्ण विषय, सर्व उपस्थितांना भारावून गेला. उपस्थितांनी मनोमनी असे ठरविले कि घनकचरा व्यवस्थापन शिस्तबद्ध आणि प्रभावी होण्यासाठी जो लोकांचा सहभाग अपेक्षित आहे त्यात सर्वांनी खारीचा वाटा उचलणे अत्यंत गरजेचे आहे.

हरियालीचे संस्थापक अध्यक्ष श्री.पुनम सिंगवी आणि इतर पदाधिकारी यांची लक्षणीय उपस्थिती हे चर्चा सत्राचे ठळक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. अशाच तऱ्हेची चर्चासत्रे मुंबई महानगर प्रदेशात ठिकठिकाणी व्हावीत अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली आणि चर्चासत्राची सांगता, श्री. आशुतोष जोशी यांनी, सर्वांचे आभार मानून केली.